**ग्राहक शिक्षण पुस्तिका**

- ''**सेव्हिंग्ज अकाऊंट**'' सुरू करण्यासाठी पात्र असल्यामुळे आरबीआयने दिलेल्या विशेष परवानगीनुसार सुरू करण्यात आलेले 'सेव्हिंग्ज अकाऊंट'' (बचत खाते) हे व्यक्ती/संस्था यांच्यासाठीचे ऑपरेटिव्ह बँकिंग अकाऊंट असते. ना नफा ना तोटा तत्त्वावर चालणाऱ्या काही विशिष्ट संस्थांनासुद्धा सेव्हिंग्ज बँक अकाऊंट सुरू करण्याची परवानगी असते. आरबीआयने विहित केलेल्या दरानुसार सेव्हिंग्ज अकाऊंटवरील शिलकीवर व्याज दिले जाते. सेव्हिंग्ज अकाऊंट सुरू करण्यासाठी पात्र असलेल्या इतर संस्थांमध्ये निवासी आणि अनिवासी भारतीय व्यक्ती, विश्वस्त संस्था, सोसायट्या, कंपनी कायद्याच्या कलम २५ अनुसार नोंदणीकृत असलेल्या कंपन्या आदींचा समावेश असतो. आरबीआयने वेळोवेळी विहित केलेल्या विशिष्ट अटींची पूर्तता करणाऱ्या काही विशिष्ट सरकारी संस्थाही सेव्हिंग्ज अकाऊंट सुरू करू शकतात.
- ''**करंट अकाऊंट**'' (चालू खाते) म्हणजे असे ऑपरेटिव्ह बँकिंग अकाऊंट की ज्यासाठी सर्व संस्था हे अकाऊंट सुरू करणे आणि ऑपरेट करण्यासाठी पात्र असतात. आरबीआयच्या विहित नियमानुसार करंट अकाऊंटमधील शिलकीवर कोणतेही व्याज दिले जात नाही.
- ''**टर्म डिपॉझिट**'' (मुदत ठेवी) म्हणजे अशा ठेवी की ज्या निश्चित कालावधीसाठी बँकेकडे ठेवण्यात आल्या असतात. यावर ठेव ठेवताना निश्चित असलेला व्याजदरच दिला जातो. टर्म डिपॉझिट्समध्ये त्रैमासिक पेआऊट डिपॉझिट, मासिक पेआऊट डिपॉझिट आणि संचयी डिपाझिट्स आदींचा समावेश असतो. कायदा किंवा नियामक घटनात्मक मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रतिबंधित केले जात नाही तोपर्यंत सर्वच संस्था मुदत ठेव खाते सुरू करण्यासाठी पात्र असतात.
- ''**रिकरिंग डिपॉझिट**'' हे लोकांसाठी उपयुक्त असते. रिकरिंग डिपॉझिटमध्ये पैसे ठेवून ठेवीदार दर महिन्याला नियमित उत्पन्न मिळवू शकतात व टर्म डिपॉझिटसाठी लागू असलेला व्याजदर या अकाऊंटला लागू असतो. टर्म डिपॉझिटमध्ये दरमहा ठरावीक रक्कम गुंतवण्यासारखेच हे आहे, म्हणजे उदा. दरमहा १००० रुपये. हे डिपॉझिट भविष्यात एका विशिष्ट तारखेला मॅच्युअर होते आणि तुम्ही या अकाऊंटला जमा केलेल्या रकमेसह व्याज तुम्हाला प्राप्त होते. अशा प्रकारे रिकरिंग डिपॉझिट ग्राहकांना त्यांची बचत वाढवण्यास मदत करून दरमहा एक विशिष्ट रक्कम या अकाऊंटला जमा करून एका विशिष्ट कालावधीत त्यावर व्याज मिळवण्यासही उपयुक्त ठरते.
- आरबीआयने आखून दिलेल्या फायनान्शियल इन्क्ल्युजन-ॲक्सेस टू बँकिंग सर्व्हिसेस' च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार फायनान्शियल इन्क्ल्युजन इनिशिएटिव्ह उपक्रमाद्वारे आमची बँक तिच्या सर्व शाखांवर बेसिक सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट अकाऊंट' (बीएसबीडीए) आणि स्मॉल अकाऊंट' या सेवा देते. तसेच, नियमानुसार बीएसबीडीए आणि स्मॉल अकाऊंट यांची ठळक वैशिष्ट्ये खाली देण्यात आली आहेत :

| **पॅरामीटर** | **बीएसबीडीए** | **स्मॉल अकाऊंट** |
|---|---|---|
| केवायसीची गरज | • संपूर्ण केवायसी, | • केवायसी नियमांत शिथिलता, |
| वैशिष्ट्ये | • किमान शिलकीची गरज नाही,<br>• अमर्याद कॅश डिपॉझिटसह असंख्य व्यवहारांची मुभा मात्र दरमहा १ लाख रुपये डिपॉझिटची मर्यादा<br>• शाखेतून महिन्यातून ४ वेळा<br>• मोफत विथड्रॉवल्स, नॉन कोटक एटीएम्सवर ५ मोफत व्यवहार<br>• ॲट-पार धनादेश पुस्तिका,<br>• मोफत फोन बँकिंग<br>• नेट बँकिंग (वैकल्पिक) - शुल्क ७५ रुपये दर तीन महिन्याला. | • किमान शिलकीची गरज नाही,<br>• अमर्याद कॅश डिपॉझिटसह असंख्य व्यवहारांची मुभा मात्र एका आर्थिक वर्षात दरमहा १ लाख रुपये डिपॉझिटची मर्यादा<br>• शाखेतून महिन्यातून ४ वेळा मोफत विथड्रॉवल्स<br>• नॉन कोटक एटीएम्सवर ५ मोफत व्यवहार, ॲट-पार धनादेश पुस्तिका, मोफत फोन बँकिंग, नेट बँकिंग उपलब्ध नाही.<br>• निर्बंध/मर्यादा - आर्थिक वर्षात सर्व क्रेडिट्सची गोळाबेरीज १,००,००० रुपयांपेक्षा अधिक होऊ नये<br>• अकाऊंटमधील शिल्लक ५०,००० रुपयांपेक्षा अधिक असू नये<br>• महिन्यातील सर्व डेबिट्सची एकत्रित गोळाबेरीज १०००० च्या वर जायला नको.<br>• परकीय चलन व्यवहाराला परवानगी नाही, |

| | | |
|---|---|---|
| निर्बंध/मर्यादा | • निर्बंध/मर्यादा - इतर सेव्हिंग्ज अकाऊंट्समध्ये परवानगी असलेल्या सर्व व्यवहारांना मुभा<br>• त्याचवेळी बीएसबीडीए धारकाला अतिरिक्त सेव्हिंग्ज अकाऊंट सुरू करता येत नाही, तथापि सामान्य सेव्हिंग्ज अकाऊंट तो अपग्रेड करू शकतो<br>• विद्यमान बचत खाते धारकाने  बीएसबीडीए सुरू केले तर बीएसबीडीए सुरू केल्यापासून ३० दिवसांच्या आत विद्यमान बचत खाते बंद करावे लागेल. | • निर्बंध/मर्यादा - आर्थिक वर्षात सर्व क्रेडिट्सची गोळाबेरीज १,००,००० रुपयांपेक्षा अधिक होऊ नये<br>• अकाऊंटमधील शिल्लक ५०,००० रुपयांपेक्षा अधिक असू नये<br>• महिन्यातील सर्व डेबिट्सची एकत्रित गोळाबेरीज १०००० च्या वर जायला नको.<br>• परकीय चलन व्यवहाराला परवानगी नाही,<br>• स्मॉल अकाऊंटधारक एकाचवेळी बँकेत इतर सेव्हिंग्ज अकाऊंट सुरू करू शकत नाही. तथापि, केवायसी नियम पूर्ण करून बीएसबीडीए/इतर सेव्हिंग्ज अकाऊंट्सची पूर्तता करू शकतो,<br>• विद्यमान बचत खाते धारकाने स्मॉल अकाऊंट सुरू केले तर स्मॉल अकाऊंट सुरू केल्यापासून ३० दिवसांच्या आत विद्यमान बचत खाते बंद करावे लागेल. |

- वैध पालकत्व प्रमाणपत्राच्या आधारावर बँक ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी, मेंटल रिटार्डेशन आणि बहुअपंगत्व असलेल्या व्यक्तींचे अकाऊंट सुरू करते. हे प्रमाणपत्र एकतर मानसिक आरोग्य कायदा १९८७ अन्वये जिल्हा न्यायालयाद्वारे दिले जाते किंवा मग ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी, मेंटल रिटार्डेशन अँड मल्टिपल डिसएँबिलिटीज कायदा १९९९ अनुसार अशा प्रकारच्या व्यक्तींसाठी स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रीय विश्वस्त संस्थेद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या स्थानिक पातळीवरील समितीद्वारे दिले जाते. अशा प्रकारचे अकाऊंट सुरू करण्यासाठी प्रमाणपत्र मिळवण्याच्या दृष्टीने वैध पालक स्थानिक पातळीवरील समितीकडे विचारणा करू शकतात. स्थानिक पातळीवरील समितीचा पत्ता राष्ट्रीय विश्वस्त संस्थेचे संकेतस्थळ (www.thenationaltrust.in) किंवा तुमच्या नजीकच्या बँकशाखेतून मिळवता येऊ शकतो. तो / ती सक्षम आहे आणि त्याचे/तिचे स्वतःचे आर्थिक व्यवहार हाताळू शकते ह्याची पुष्टी ग्राहकाकडून करण्यात येण्याच्या सापेक्ष अशा व्यक्तींची पुढील खाती ही कायदेशीर पालकत्व प्रमाणपत्राशिवाय उघडता येऊ शकतात.
- आमच्या सर्व शाखांवर वरील सर्व खात्यांबाबतचा तपशील उपलब्ध आहे आणि आमच्या बँकेच्या संकेतस्थळावरूनही त्याची माहिती प्राप्त करता येऊ शकते.
- कोणतेही डिपॉझिट अकाऊंट सुरू करण्यापूर्वी बँक आरबीआयने आखून दिलेल्या ''नो युवर कस्टमर'' (केवायसी) मार्गदर्शक तत्त्वांनुसार किंवा तत्सम इतर नियम वा बँकेच्या प्रक्रियेनुसार सर्व प्रकारच्या खात्री करून घेईल.
- भावी ठेवीदाराला बँकेद्वारा अकाऊंट ओपनिंग अर्ज दिला जाईल. भावी ठेवीदार जेव्हा डिपॉझिट अकाऊंट सुरू करण्यासाठी बँकेकडे विचारणा करेल त्यावेळी बँक कर्मचारी त्याला सर्व प्रक्रिया तपशीलवार समजावून सांगतील. अकाऊंट ओपनिंगचा अर्ज संपूर्णपणे भावी ठेवीदारानेच अचूकरित्या भरावा.
- सेव्हिंग्ज अकाऊंट आणि करंट अकाऊंट यांसारख्या डिपॉझिट उत्पादनांसाठी, विशिष्ट सरासरी त्रैमासिक शिल्लक (एक्यूबी)/सरासरी मासिक शिल्लक (एएमबी), हे सर्व कोणत्या प्रकारचे अकाऊंट सुरू केले जात आहे त्यावर अवलंबून असेल आणि त्याबाबतची सर्व माहिती, अटी-नियम यांची पूर्तता करूनच अशा प्रकारच्या अकाऊंट्सचे व्यवस्थापन केले जाईल. उल्लेखित एक्यूबी/एएमबी यांचे नीट व्यवस्थापन करता न आल्यास त्यावर नॉन मेन्टेनन्स शुल्क (एनएमसी) आकारले जाईल.
- शुल्क आकारणीची माहिती बँकेच्या संकेतस्थळावर (www.kotak.com) व शाखांमध्येही देण्यात आली आहे.
- पात्र व्यक्तींसाठी आणि संस्था/संघटना यांच्यासाठी सेव्हिंग्ज बँक अकाऊंट सुरू करता येऊ शकते (भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) वेळोवेळी आखून दिलेल्या विहित अटींची पूर्तता करणे त्यासाठी आवश्यक आहे)
- व्यक्ती / भागीदार संस्था / खासगी आणि सार्वजनिक कंपन्या / अविभक्त हिंदू कुटुंब (एचयूएफ) / विशिष्ट संघटना/ सोसायट्या / विश्वस्त संस्था इत्यादी जण करंट अकाऊंट सुरू करू शकतात.

- व्यक्ती/भागीदार संस्था/खासगी आणि सार्वजनिक कंपन्या/एचयूएफ/विशिष्ट संघटना/सोसायट्या/विश्वस्त संस्था इत्यादी जण मुदत ठेवीचे अकाऊंट सुरू करू शकतात.
- डिपॉझिट अकाऊंट सुरू करताना लागू असलेल्या खात्री करून घेण्याच्या प्रक्रियेत व्यक्तीची ओळख पटवणे, पत्त्याची पडताळणी, त्याचा व्यवसाय, नोकरी यांची खातरजमा करून घेणे/त्याच्या कृतींची पातळी समजून घेणे, उत्पन्नाचा स्रोत इत्यादींचा समावेश असतो. भावी ठेवीदाराची ओळख बँकेला स्वीकारार्ह असलेल्या व्यक्तीकडून केली जाणे हेही आवश्यक असू शकते. खाते उघडणाऱ्या/ऑपरेट करत असणाऱ्या व्यक्तीचे अलीकडील छायाचित्रही बँकेला खात्री करून घेण्यासाठी आवश्यक ठरू शकते.
- खातरजमा करून घेण्याच्या प्रक्रियेबरोबरच केवायसी नियमांतर्गत बँकेला भावी ठेवीदाराचा परमनंट अकाऊंट नंबर (पीएएन) किंवा त्याला वैकल्पिक म्हणून प्राप्तिकर कायदा/नियमानुसार फॉर्म क्रमांक ६० किंवा ६१ यांची आवश्यकता भासू शकते.
- ठरावीक कालावधीनंतर बँक नवीन किंवा अतिरिक्त केवायसी दस्तऐवजांची मागणी ग्राहकाकडे करू शकते, जे की आरबीआयच्या नियमानुसार आहे.

**सिंगलली ऑपरेटेड अकाऊंट**

अशा प्रकारचे अकाऊंट्स एकाच व्यक्तीद्वारे, जो की १८ वर्षांपेक्षा मोठा असेल, सुरू किंवा ऑपरेट केले जाऊ शकतात.

**जॉइन्ट अकाऊंट**

दोन किंवा अधिक व्यक्तींद्वारे त्यांच्या नावाने सुरू करण्यात आलेल्या डिपॉझिट खात्याला जॉइन्ट अकाऊंट असे म्हणतात.

**जॉइन्ट अकाऊंटची कार्यप्रणाली**

एकापेक्षा अनेक व्यक्तींनी सुरू केलेल्या जॉइन्ट अकाऊंटची कार्यप्रणाली पुढीलप्रमाणे चालते

**स्वतः किंवा वारसदार**

हा भाग दोन व्यक्तींच्या नावावर असलेल्या अकाऊंटसाठी आहे. या भागात, अकाऊंट स्वतः खातेदार किंवा त्यांचा वारसदार (खातेदारांपैकी एकाचा मृत्यू झाल्यास किंवा त्यांना शक्य न झाल्यास) यांच्याद्वारे ऑपरेट होऊ शकते.

**कोणीही किंवा वारसदार**

हा भाग दोन व्यक्तींच्या नावावर असलेल्या अकाऊंटसाठी आहे. या भागात, अकाऊंट स्वतः खातेदार किंवा त्यांचा वारसदार (खातेदारांपैकी एकाचा मृत्यू झाल्यास किंवा त्यांना शक्य न झाल्यास) यांच्याद्वारे ऑपरेट होऊ शकते.

**जॉइन्टली**

या प्रकारच्या खात्यात, सर्व खातेदारांनी स्वाक्षऱ्या केल्या असतील तर त्यांच्याद्वारेच हे अकाऊंट ऑपरेट केले जाऊ शकते.

सर्व खातेदारांच्या संमतीने अकाऊंट कोणी ऑपरेट करावे याचा निर्णय होऊ शकतो.

अल्पवयीनाने नैसर्गिक पालक/पालक यांच्या साथीने सेव्हिंग्ज बँक अकाऊंट सुरू केल्यास ते केवळ पालकच ऑपरेट करू शकतील.

जॉइन्ट खातेदार वरील अकाऊंट्समधील शिलकीच्या विल्हेवाटीसंदर्भात पुढीलप्रमाणे अधिकार बहाल करू शकतात...

- स्वतः किंवा वारसदार : खाते जर अ आणि ब यांच्या नावाचे असेल तर खातेदारांपैकी कोणाही एकाचा मृत्यू झाल्यास त्याच्या पश्चात वारसदाराला त्या खात्यातील अंतिम शिल्लक रक्कम व्याजासह, लागू असल्यास, दिली जाते.
- कोणीही किंवा वारसदार : दोनपेक्षा अधिक म्हणजे अ, ब आणि क व्यक्ती खातेदार असतील तर कोणाही दोन खातेदारांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या पश्चात वारसदाराला त्या खात्यातील अंतिम शिल्लक रक्कम व्याजासह, लागू असल्यास, दिली जाते.
- खातेदार/वारसदार : पहिला खातेदार स्वतः एकटाच खाते ऑपरेट करू शकतो आणि खात्यातील पैशावर त्याचा संपूर्ण हक्क असतो. मात्र, पहिल्या खातेदाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या वारसदाराचा हक्क त्या खात्यावर असतो.

- खातेधारकानंतर ज्याचे नाव असते तो/वारसदार : बँकेच्या पासबुकावर पहिल्या खातेदारानंतर ज्याचे नाव असते ती व्यक्ती खाते ऑपरेट करू शकते. त्याचाही खात्यातील पैशावर संपूर्ण हक्क असतो. दुसऱ्या खातेदाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या वारसदाराचा हक्क त्या खात्यावर असतो.

**जॉइन्ट अकाऊंट होल्डर्समध्ये नाव समाविष्ट करणे किंवा वगळणे**

सर्व जॉइन्ट अकाऊंट धारकांच्या विनंतीनुसार बँक त्यांच्या खात्यात नावाचा समावेश करणे किंवा त्यातून नाव वगळण्याची प्रक्रिया करू शकते. तशी परिस्थिती असेल तरच जॉइन्ट अकाऊंट धारकांच्या खात्यात इतर एखाद्या व्यक्तीच्या जॉइन्ट अकाऊंट धारक म्हणून नावाचा समावेश होऊ शकतो.

**अल्पवयीनाचे खाते**

अल्पवयीनाच्या नावाने त्याचे नैसर्गिक पालकच खाते सुरू करू शकतात आणि ते ऑपरेटही करू शकतात. सज्ञान झाल्यानंतर पूर्वाश्रमीचा अल्पवयीन खातेधारक त्याच्या खात्यातील शिलकीची खातरजमा करू शकतो आणि जर खाते त्याच्या पालकांकडून ऑपरेट केले जात असेल तर पूर्वाश्रमीच्या अल्पवयीनाची ताजी स्वाक्षरी घेतली जाईल व तिची त्याच्या पालकांकडून खातरजमा करून घेतली जाईल, तसेच अल्पवयीन सज्ञान झाल्यानंतर त्याच्या केवायसी दस्तऐवजांची मागणी केली जाईल व त्यानुसार सर्व प्रक्रिया पार पडल्यानंतर त्याचे नाव खात्यावर येईल.

**अशिक्षित/अंध व्यक्तीचे खाते**

बँक अशिक्षित व्यक्तीच्या करंट खात्याव्यतिरिक्त तिच्या अधिकारानुसार डिपॉझिट खाते उघडण्यासही संबंधितास परवानगी देऊ शकते. अशा व्यक्तीचे खाते उघडले जाऊ शकते मात्र त्याने ठेवीदार व बँक या दोघांच्याही ओळखीच्या असलेल्या व्यक्तीला साक्षीदार म्हणून बँकेत बोलावणे बंधनकारक आहे. साधारणतः अशा प्रकारच्या सेव्हिंग्ज बँक अकाऊंटसाठी धनादेश पुस्तिका दिली जात नाही. विथड्रॉवलच्या वेळी/ठेव म्हणून ठेवलेली रक्कम परत देताना आणि/किंवा व्याज देताना खातेधारकाने त्याच्या अंगठ्याचा ठसा उमटवावा किंवा खातेधारकाला ओळखत असल्याची खातरजमा करणाऱ्या व्यक्तीबरोबर बँकेच्या सक्षम अधिकाऱ्यासमोर ठसा उमटवावा. अशिक्षित/अंध व्यक्तीला त्याच्या खात्याविषयीची सर्व माहिती बँकेच्या कर्मचाऱ्यांनी द्यावी.

**पॉवर ऑफ ऍटर्नी**

ठेवीदाराच्या विनंतीनुसार बँक ठेवीदाराने त्याच्यावतीने त्याचे खाते ऑपरेट करण्याचे हक्क/पॉवर ऑफ ॲटर्नी दिलेल्या व्यक्तीची नोंद बँक स्वतःकडे करून ठेवेल.

**नामनिर्देशन सुविधा**

सर्व प्रकारच्या ठेवीखात्यांसाठी नामनिर्देशन सुविधा उपलब्ध आहे. नामनिर्देशन सुविधा एकल स्वामित्वहक्क अकाऊंटसंदर्भातही उपलब्ध आहे. नामनिर्देशन केवळ एका व्यक्तीचेच करता येते. अशा प्रकारे केलेले नामनिर्देशन खातेधारकाकडून केव्हाही रद्द करता येऊ शकते किंवा बदलता येऊ शकते. नामनिर्देशन करताना, ते रद्द करताना किंवा त्यात बदल करताना तिसरा पक्ष त्याचा साक्षीदार असणे आवश्यक आहे. खातेधारकाच्या सहमतीने नामनिर्देशनात सुधारणा करता येऊ शकते. अल्पवयीनालासुद्धा नामनिर्देशित करता येऊ शकते. सर्व व्यक्तींनी त्यांच्या खात्यासाठी वारसदाराचे नामनिर्देशन करणे गरजेचे असल्याची शिफारस करण्यात येत आहे, कारण त्यामुळे खातेधारकाच्या मृत्यूनंतर सर्व प्रकारच्या दाव्यांचे निराकरण होणे सोपे जाते. वारसदाराला, खातेधारकाचा मृत्यू झाल्यास, खात्यातील शिलकीची रक्कम कायदेशीर वारसदार म्हणून मिळेल. डिपॉझिट अकाऊंट सुरू करताना खातेधारकाला नामनिर्देशनाच्या सुविधेची माहिती सांगितली जाईल. दुहेरी स्वीप सुविधेच्या माध्यमातून (ऍक्टिव्ह मनी) सुरू करण्यात आलेल्या टर्म डिपॉझिट्ससाठी सेव्हिंग्ज/करंट अकाऊंटसाठी नामनिर्देशनाचा विचार केला जाईल.

**धनादेश पुस्तिका आणि धनादेश**

सेव्हिंग्ज, करंट किंवा ओव्हरड्राफ्ट अकाऊंटधारकांना बँकेच्या विहित शुल्कानुसार धनादेश पुस्तिका वितरित केल्या जातील. धनादेश पुस्तिका ग्राहकाला त्याच्या निवासी पत्त्यावर पाठवली जाईल. बँक तिच्या अधिकारानुसार व कायद्यानुसार विशिष्ट ग्राहकांना 'ऍट पार' धनादेश पुस्तिका देऊ शकते.

एखाद्या खातेधारकाचा एक कोटी रुपये किंमतीचा धनादेश एकाच आर्थिक वर्षात चार किंवा त्याहून अधिक वेळा खात्यात पुरेशी रक्कम नसल्याकारणाने वटला गेला नसेल तर अशा कोणत्याही व्यक्तीला, ज्याचे सेव्हिंग्ज, करंट किंवा ओव्हरड्राफ्ट खाते असेल, धनादेश पुस्तिकेचे वितरण करू नये. तसेच बँक तिच्या अधिकारात करंट अकाऊंट बंद करण्याचा निर्णयही घेऊ शकते.

धनादेश सातत्याने वटत नसेल तर/महिन्याकाठी अमूकच धनादेश पुस्तिका दिल्या जात असतानाही त्याच्यापेक्षा जास्त प्रमाणात धनादेश वितरित होत असल्यास धनादेश पुस्तिकेचे वितरण संबंधित खातेधारकाला न देण्याचे धोरण बँक ठरवू शकते. (व्यक्तिगत खातेधारकाला १०० पेक्षा जास्त धनादेश देऊ नयेत आणि संस्थात्मक खातेधारकाला ५०० पेक्षा धनादेश पुस्तिका देऊ नयेत.)

ग्राहकांनीही धनादेश असे लिहावेत किंवा काढावेत की तो वटताना त्यावर खाडाखोड होणार नाही आणि ग्राहकाची स्वाक्षरी बँकेकडे नोंद असलेल्या स्वाक्षरीशी मिळतीजुळती आहे किंवा नाही याचीही खात्री करून घेतली जावी. धनादेशावरील कोणत्याही खाडाखोडीवर ग्राहकाची स्वाक्षरी केली जावी.

**अकाऊंट स्टेटमेंट**

अकाऊंट सुरू करण्याच्या अटी व नियमांनुसार सेव्हिंग्ज तसेच करंट डिपॉझिट अकाऊंटधारकांना ठरावीक कालावधीनंतर बँकेकडून अकाऊंट स्टेटमेंट दिले जाईल.

**पासबुक सुविधा**

ग्राहकाच्या विनंतीनुसार व्यक्तिगत ग्राहकांना बँक पासबुकाची सुविधा उपलब्ध करून देते. पासबुक सुविधेचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांना शुल्काच्या नियमांनुसार विशिष्ट शुल्क आकारणी केली जाईल.

**थेट डेबिट आणि स्थायी सूचना**

पेमेंट पद्धतीमुळे ग्राहक आम्हाला बँक म्हणून नियमित पेमेंट्स करण्याची परवानगी देतो. उदाहरणार्थः एका अकाऊंटमधून दुसऱ्या अकाऊंटमध्ये फंड्स हस्तांतरित करणे, लॉकरचे भाडे देणे, क्रेडिट कार्डाचे पैसे देणे, जीवन विम्याचे पैसे देणे आणि निश्चित लाभार्थ्याला द्यावे लागणारे कोणतेही ठरावीक कालावधीतील पैसे. तसेच या सुविधेमुळे ग्राहकाला धनादेश लिहिण्याच्या त्रासदायक प्रकारातून सुटकाही मिळते.

या सेवेचा लाभ घेण्यासाठी तुमचे थेट डेबिट मत निश्चित असावे व त्याची अंमलबजावणी यशस्वीरित्या झालेली असावी.

**सरासरी त्रैमासिक/मासिक शिल्लक**

एक्यूबी - एका कॅलेंडर वर्षातील सलग तीन महिन्यांत ग्राहकाने त्याच्या खात्यात किती रक्कम शिल्लक ठेवली याचा तपशील सरासरी त्रैमासिक शिल्लक (एक्यूबी) देते.

एएमबी - एका महिन्यात ग्राहकाने त्याच्या खात्यात किती रक्कम शिल्लक ठेवली याचा तपशील सरासरी मासिक शिल्लक (एएमबी) देते.

एक्यूबी/एएमबी यांची गोळाबेरीज खालीलप्रमाणे केली जाते एएमबी = महिना किंवा त्रैमासिकाच्या अखेरच्या दिवशी शिल्लक असलेली रक्कम (त्या महिन्यात किंवा तीन महिन्यातील दिवसांची संख्या)

**बचत खात्यातील (सेव्हिंग्ज अकाऊंट) व्याजदराचे पेमेंट**

''बचत खात्यावरील व्याजदर दर दिवसाच्या उत्पादनाच्या आधारावर दिले जाते.

१ एप्रिल २०१६ पासून प्रभावी, बचत बँक शिलकीवर मिळालेले व्याज हे त्रैमासिक तत्त्वावर जून, सप्टेंबर, डिसेंबर आणि मार्च ह्या वेळी जमा करण्यात येईल.''

बचत खात्यावरील व्याज दर खालीलप्रमाणे आहेत:

| **खाते शिल्लक** | **व्याज दर** |
|---|---|
| सर्व शिल्लक रकमेसाठी | २.५०% प्रतिवर्ष |

**इलस्ट्रेशनः-**

दिवसाच्या समाप्तीला खात्यामधील शिल्लक = रु. ५५,००,०००

सर्व शिल्लक रकमेसाठी निश्चित व्याज = प्रतिवर्ष २.५०%

दिवसासाठी प्रदेय व्याज हे खालीलप्रमाणे परिगणित करण्यात येईल:

(५५,००,००० * २.५०% * १/३६५)

*सध्या आरबीआयने बचत खात्यावरील व्याजदर अनियमित केला आहे. त्यामुळे तो वेळोवेळी बदलत राहतो.

**टर्म डिपॉझिट्सवरील देय व्याज**

टर्म डिपॉझिट खातेधारकाच्या रकमेवर अदा करण्यात आलेले एकंदर व्याज/देय असलेले व्याज प्राप्तिकर कायद्याद्वारे विहित करण्यात आलेल्या रकमेहून जादा झाल्यास स्त्रोत कर वजावट (टॅक्स डिडक्ट ॲट सोर्स) करण्याचा बँकेला कायदेशीर अधिकार आहे. कर वजावट करण्यात आलेल्या रकमेसंदर्भात बँक संबंधित खातेधारकाला कर वजावट प्रमाणपत्र (टीडीएस सर्टिफिकेट) देईल. ठेवीदार टीडीएसच्या सवलतीला पात्र असेल तर कोणताही टीडीएस कापणे टाळण्यासाठी त्याने दर आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच बँकेकडे विहित नमुना अर्जात तसे जाहीर करणारे पत्र द्यावे.

ॲक्टिव्ह मनीसाठी (दुहेरी स्वीप डिपॉझिट्स) रेग्युलर टर्म डिपॉझिट दर लागू असतील आणि ते ज्येष्ठ नागरिक/बँकेचा कर्मचारीवृंद यांच्यासह सर्वांनाच लागू असेल.

पुनर्गुंतवणूक ठेवींच्या बाबतीत १८१ दिवस किंवा त्याहून जास्त दिवस जर ठेव बँकेकडेच ठेवायचा गुंतवणूकदाराचा मानस असेल तर टीडीवरील व्याज त्रैमासिक दराच्या आधारावर वाढवले जाईल. १८१ दिवसांच्या खालील कालावधीसाठी व्याज मॅच्युरिटीच्यावेळी असलेल्या साध्या व्याजानुसारच दिले जाईल.

**टर्म डिपॉझिटवरील व्याजाची मोजणी करण्याची पद्धत**

**मासिक व्याज पेआऊट पर्याय**

मासिक व्याज टीडीसाठी व्याजदर प्रमाणित दरापेक्षा सवलतीत दिला जाईल.

व्याज ठेव ठेवल्याच्या तारखेपासून मासिक अंतराने दिले जाईल. उदाहरणार्थ, १५ फेब्रुवारी २००८ रोजी ठेवण्यात आलेल्या ठेवीवर १५ मार्च २००८ रोजी व्याज दिले जाईल.

नॉन-लीप (लीप वर्ष नसलेल्या) वर्षामध्ये ठेवण्यात आलेल्या ठेवींसाठी वर्षातील ३६५ दिवसांनुसार आणि लीप (कॅलेन्डर) वर्षामध्ये काढण्यात आलेल्या मुदत ठेवींसाठी वर्षातील ३६६ दिवसांनुसार व्याज परिगणित करण्यात येते.

त्रैमासिक व्याज पेआऊट पर्याय व्याज ठेव ठेवल्याच्या तारखेपासून त्रैमासिक अंतराने दिले जाईल. उदाहरणार्थ, १५ फेब्रुवारी २००८ रोजी ठेवण्यात आलेल्या ठेवीवर १५ मे २००८ रोजी व्याज दिले जाईल.

नॉन-लीप (लीप वर्ष नसलेल्या) वर्षामध्ये ठेवण्यात आलेल्या ठेवींसाठी वर्षातील ३६५ दिवसांनुसार आणि लीप (कॅलेन्डर) वर्षामध्ये काढण्यात आलेल्या मुदत ठेवींसाठी वर्षातील ३६६ दिवसांनुसार व्याज परिगणित करण्यात येते.

संचयी व्याज पेआऊट पर्याय संचयी ठेवीअंतर्गत, व्याज त्रैमासिक अंतराने वाढवले जाईल, उदा. तीन महिन्यांच्या कालावधीत संचित झालेले व्याज पुढील तीन महिन्यांसाठी देय असलेल्या व्याजाच्या मोजणीसाठी मुद्दलात समाविष्ट केले जाईल. त्रैमासिक व्याजाच्या मोजणीचे सूत्र त्रैमासिक व्याज पेआऊट पर्यायासमानच आहे.

इलस्ट्रेशन

| तिमाही | मुद्दल रक्कम | व्याज | पुढील वर्षासाठी प्रिन्सिपल तिमाही |
|---|---|---|---|
| १ | १०० | २ | १०२ |
| २ | १०२ | २.०४ | १०४.०४ |
| ३ | १०४.०४ | २.०८ | १०६.१२ |

डिपॉझिटच्या मॅच्युरिटीपर्यंत अशाच पद्धतीने पुढील तीन महिन्यांच्या व्याजाची मोजणी केली जाईल. वरील इलस्ट्रेशन टीडीएसचा प्रभाव गृहीत न धरता केले आहे. ठेवीचा कालावधी १८१ दिवसांपेक्षा कमी किंवा दोन तिमाहींपेक्षा कमी असेल तर ठेवीवर संचयी व्याज दिले जात नाही.

**ज्येष्ठ नागरिक मुदत ठेवी (६0 वर्षे आणि त्यावरील)**

ज्येष्ठ नागरिकांनी बँकेत ठेवलेल्या मुदत ठेवींवर जादा व्याजदर देण्याचे धोरण बँकेने वेळोवेळी जाहीर केले आहे. बँकही ज्येष्ठ नागरिकांद्वारा ठेवण्यात आलेल्या मुदत ठेवींबाबत प्राप्तिकर कायद्यान्वये लागू असलेल्या नियमांचे पालन करेल.

**स्त्रोताच्या ठिकाणी कर वजावट (टीडीएस)**

ठेवीदाराला लागू असलेल्या व्याजाने आर्थिक वर्षादरम्यान आयटी कायदा, १९६१ अन्वये लागू असलेली मर्यादा ओलांडली तर टीडीएस लागू होईल. सध्या, ही मर्यादा ४०,००० रुपये आहे. टीडीएसचा दर आयटी कायद्यात विहित करण्यात आल्यानुसार आकारला जाईल.

**टीडीएसमधून सवलत**

आयटी कायद्यात उल्लेखित करण्यात आलेल्या विशिष्ट नियमांनुसार टीडीएसमधून सवलत मिळवता येऊ शकते. मात्र, त्यासाठी पुढील फॉर्म भरावे लागतील.

फॉर्म १५जी हा जाहीरनामा आहे, ज्याद्वारे असे जाहीर केले जाते की ठेवीदार कर देण्यास पात्र नाही आणि त्यामुळे टीडीएसमधून त्याला सवलत दिली जावी. ज्येष्ठ नागरिकांव्यतिरिक्त व्यक्ती किंवा इतर व्यक्ती (ज्या कंपनी किंवा संस्था नाहीत) त्यांना फॉर्म १५जी लागू होतो.

फॉर्म १५एच हा जाहीरनामा आहे, ज्याद्वारे असे जाहीर केले जाते की ठेवीदार कर देण्यास पात्र नाही आणि त्यामुळे टीडीएसमधून त्याला सवलत दिली जावी. फॉर्म १५एच निवासी व्यक्तींना जे की ज्येष्ठ नागरिक आहेत (म्हणजे वयवर्षे ६५ पेक्षा अधिक) त्यांना लागू होतो.

आयटी अधिकाऱ्याकडून सवलतीचे प्रमाणपत्र - फॉर्म १५एए आयटी कायदा असेही सांगतो की, कोणत्याही उत्पन्नाची सरासरी रक्कम, जी की त्या कलमात नोंदवण्यात आली आहे, आधीच्या वर्षात क्रेडिट झाली किंवा अदा करण्यात आली किंवा क्रेडिट होणार आहे किंवा अदा केली जाणार आहे, जिने कमाल रकमेची मर्यादा ओलांडली असेल त्यावर कर लावण्यात आला नसेल, तर तरतुदी तिला लागू होत नाही आणि ऍसेसीज १५जी फॉर्ममध्ये जाहीर करण्यास पात्र नसतील. अशा प्रकारांत, आयटी अधिकाऱ्याकडून विशिष्ट सवलत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. विश्वस्त संस्था/सोसायट्या इत्यादींसारख्या संस्था ज्यांना प्राप्तिकरातून सवलत देण्यात आली आहे, त्यांना असे पत्र/फॉर्म १५एए सादर करावे लागेल, आर्थिक वर्षादरम्यान अदा केले गेलेले किंवा अदा करणे अपेक्षित असलेल्या व्याजाने किमान रकमेची मर्यादा ओलांडली असेल की जी करपात्र नाही.

**टर्म डिपॉझिटची प्रीमॅच्युअर विथड्रॉवल**

मॅच्युरिटीच्या प्रत्यक्ष तारखेपूर्वीच ग्राहक त्याची रक्कम अंशतः/पूर्णतः काढू शकतो. प्रीमॅच्युअर विथड्रॉवलच्या प्रकारात डिपॉझिट ठेवल्याच्या तारखेपासून बँकेकडे डिपॉझिट ठेवल्याच्या तारखेपर्यंत या कालावधीत लागू असलेला व्याजदर लागू असेल किंवा डिपॉझिट ठेवले त्यावेळी व्याज देण्याबाबत जो करार झाला असेल तो व्याजदर, यांपैकी जे डिपॉझिटच्या प्रीमॅच्युअर विथड्रॉवलसाठी आकारण्यात आलेल्या दंडानंतर कमी असेल ते देण्यात येईल. जे की खालीलप्रमाणे १ नोव्हेंबर २०१२ रोजी किंवा त्यानंतर टर्म डिपॉझिटचे आरक्षण/नूतनीकरण करण्यात आले.

| टर्म डिपॉझिटचा कालावधी | दंड |
|---|---|
| १८१ दिवसांपेक्षा कमी | काहीच नाही |
| १८१ दिवस आणि त्यावर | ०.५०% |

[ उदाहरणार्थ, समजा टीडी रक्कम १५ लाख रुपये आहे, १-२ वर्षांसाठी व्याजदर १०% आहे आणि २-३ वर्षांसाठी तो ९.५०% आहे आणि ग्राहकाने २ वर्ष १ दिवसासाठी (म्हणजे ९.५०%) रक्कम डिपॉझिट केली. ग्राहकाने १ वर्षानंतर रोख टीडी घेतला तर व्याज ९% (कंत्राट केलेल्या दरापेक्षा कमी/डिपॉझिट ठेवलेल्या कालावधीसाठी दर लागू आणि दंडशुल्क आकारणी ०.५०%) दराने दिला जाईल. अंशतः प्रीमॅच्युअर एन्कॅशमेंट असेल तर उर्वरित रकमेवर मूळ रकमेच्या डिपॉझिटच्यावेळी ठरल्याप्रमाणे व्याज मिळत राहील.]

सेव्हिंग/करंट अकाऊंटशी जोडलेले १८१ दिवस आणि त्यावरील कालावधीसाठी ठेवण्यात आलेले स्टँडअलोन टर्म डिपॉझिट रेग्युलर स्वीप डिपॉझिट फंक्शनॅलिटीप्रमाणे वागवले जाईल आणि दंडशुल्क आकारणी वरीलप्रमाणे लागू असेल.

**टर्म डिपॉझिट्सचे पेमेंट/नूतनीकरण**

डिपॉझिट बुकिंगच्यावेळीच मॅच्युरिटी आणि पेमेंटविषयीच्या सूचना देणे अनिवार्य असेल. ग्राहकाला बँकेतील त्याच्या करंट/सेव्हिंग्ज अकाऊंटमध्ये पैसे मिळण्याचा पर्याय खुला असेल किंवा तो बँकेला लेखी विनंती करून रकमेचा डीडी/बीसी त्याच्या पत्त्यावर मागवून घेऊ शकतो, जो की बँकेकडे नोंदवलेला असेल. ठेवीच्या कालावधीत कोणत्याही वेळी मॅच्युरिटीबाबतच्या सूचनांमध्ये बदल करण्याचा अधिकार ग्राहकाला आहे. या सूचना राखून ठेवण्यात येतील आणि त्याची अंमलबजावणी मॅच्युरिटीच्यावेळी करण्यात येईल.

**टर्म डिपॉझिट्सच्या तुलनेत ओव्हरड्राफ्ट**

ठेवीदाराला त्याच्या ठेवीच्या तुलनेत कर्ज/ओव्हरड्राफ्ट घेता येऊ शकते. अनामतीसंदर्भात योग्य आणि आवश्यक त्या सर्व दस्तऐवजांची पूर्तता केल्यानंतर ठेवीदाराला कर्ज किंवा ओव्हरड्राफ्ट मिळू शकते. अल्पवयीनाच्या नावाने ठेवलेल्या रकमेवरही बँक कर्ज देण्याचा विचार करू शकते, तथापि, घेतले जाणारे कर्ज अल्पवयीनाच्या लाभासाठीच घेतले जात असल्याचा योग्य जाहीरनामा ठेवीदाराकडून/अर्जदाराकडून सादर केला जाणे आवश्यक आहे.

**रिकरिंग डिपॉझिट**

**व्याजाचे पेमेंट**

- आरडीवरील व्याजाची मोजमाप बँकेकडून केली जाईल त्यासाठी भारतीय बँक संघटनेद्वारे देण्यात आलेल्या पद्धतीचा अवलंब केला जाईल.
- आरडीसाठीचा व्याजदर आरडीचे बुकिंग केल्याच्या तारखेला टर्म डिपॉझिटसाठी लागू असलेल्या व्याजदरानुसारच असेल.
- आरडीवरील व्याज लागू दरांनुसार त्रैमासिक कालावधीनंतर वाढवले जाईल.

**हप्त्याचे पेमेंट**

- हप्त्याची रक्कम एकदा निश्चित झाली की मग त्यात नंतरच्या तारखेला बदल करण्याची मुभा नाही.
- पेमेंटच्यावेळी एकापेक्षा अधिक हप्ता राहिला असेल तर अदा झालेली रक्कम फक्त एकच हप्ता कव्हर करण्याइतपत पुरेशी असल्यास थकलेल्या पहिल्या/आधीच्या हप्त्यात ती वळती केली जाईल.
- हप्त्याच्या अंशतः/ॲडव्हान्स्ड पेमेंटला परवानगी नाही.
- हप्त्यांची नियमित परतफेड करण्यासाठी ठेवीदाराला त्याच्या/तिच्या/त्यांच्या खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक ठेवण्याचे कळवण्याची जबाबदारी बँकेची राहणार नाही.

**पात्रता**

निवासी व्यक्ती (अल्पवयीनांसह) आणि एचयूएफ

**मॅच्युरिटी**

- ठरल्याप्रमाणे ठरावीक कालावधीतच डिपॉझिट मॅच्युअर व्हायला हवे, हप्ते थकले असले तरी, आणि अशा प्रकारच्या थकित हप्त्यांसाठी लागू असलेली दंडात्मक व्याज आकारणी वजा करून त्यानंतर त्याचे रिपेमेंट केले जावे.
- डिपॉझिट महिनाभराच्या आतच बंद करण्यात आले तर त्यावर कोणतेही व्याज देऊ नये आणि फक्त मुद्दलच परत केले जावे.
- आरडी ॲडव्हाइसवर उल्लेखित करण्यात आलेली मॅच्युरिटीची रक्कम सर्व हप्त्यांचा वेळेत भरणा करण्याशी संबंधित आहे.

**हप्ता भरण्यास उशीर केल्यास दंड**

- ५ दिवसांच्या वाढीव कालावधीनंतरही कोणत्याही हप्त्याची रक्कम थकली तर दंड आकारणी आरडी व्याजदराएवढी (आरडीचे बुकिंग करताना ठरवण्यात आलेला दर) + २% द.सा. अशी असेल किंवा मग वेगळा असा दर की जो बँकेने वेळोवेळी जाहीर केला असेल, तो थकलेल्या महिन्यात आकारला जाईल.
- अशा प्रकारच्या व्याजाची मोजणी करताना महिन्याचा छोटासा कालावधीही पूर्ण महिना म्हणून गृहीत धरला जाईल.
- हप्त्याच्या महिन्याचे पेमेंट दिले गेले असेल परंतु हप्तावसुलीबाबतच्या स्थायी सूचनांचे पालन करण्यात अपयश आले असेल तर बँक जनरल फीचर्स अँड शेड्युल ऑफ चार्जेस (जीएफएससी) अनुसार स्थायी सूचनांचे पालन करण्यात आलेल्या अपयशाबाबतचा दंड करंट/सेव्हिंग्ज खात्यातून आकारला जाईल.
- एकूण दंडात्मक व्याजशुल्काची आकारणी बँकेकडून पेएबल असणाऱ्या एकूण व्याजातून वसूल केली जाईल आणि ती फक्त मॅच्युरिटीच्यावेळीच आकारली जाईल किंवा अकाऊंट विहित कालावधीच्या आधीच बंद केले तर आकारली जाईल.

**आरडीचे प्रीमॅच्युअर विथड्रॉवल**

- ठेव (डिपॉझिट) महिनाभरातच विहित मुदतीच्या आत बंद केल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही आणि फक्त मूळ मुद्दलच परत केली जाईल.
- आरडीचे विहित कालावधीच्या आतच विथड्रॉवल करण्यात आले तर डिपॉझिट ठेवल्याच्या तारखेपासून बँकेकडे जेवढे दिवस डिपॉझिट राहिले तेवढ्या दिवसाचे व्याज देण्यात येईल किंवा डिपॉझिट ठेवताना ठरलेला दर यांच्यापैकी जे प्रीमॅच्युअर विथड्रॉवलसाठी ०.५% दंड आकारल्यानंतर जे कमी असेल ते देण्यात येईल.

परकीय चलनासंदर्भातील व्यवहार करण्यासाठी भारतातील निवडक शाखांमध्ये (ब श्रेणी) परकीय चलनासंदर्भातील सेवा विस्तारित करण्यात आल्या आहेत.

- ट्रॅव्हलर्स चेक (टीसी)
- रोख परकीय चलन खरेदी/विक्री
- वायर ट्रान्सफर
- डिमांड ड्राफ्ट्स

**ट्रॅव्हलर्स चेक्स**

सध्या बँक पुढील चार मोठ्या चलनांतील ट्रॅव्हलर्स चेक्स अदा करते, ते म्हणजे यूएस डॉलर, ग्रेट ब्रिटन पाऊंड, जपानी येन आणि युरो, जे की परदेशात प्रवास करताना प्रवासी वापरू शकतात. अशा प्रकारचे टीसी वितरित करताना फेमा/आरबीआय यांनी वेळोवेळी विहित केलेल्या नियमांच्या आधारावरच व त्यांच्या नियमांचे पालन करूनच वितरित करण्यात आले आहेत.

**धनादेश**

आमचे ग्राहक म्हणून तुम्ही सर्व प्रकारच्या चलनांतील धनादेश डिपॉझिट करू शकता. तुम्ही फक्त तुमच्या कोटक महिंद्रा बँक अकाऊंटचा उल्लेख करून तुमचा डिमांड ड्राफ्ट किंवा धनादेश खाली दिलेल्या पत्त्यावर आम्हाला पाठवा आणि आम्ही तुमच्या ओव्हरसीज बँकेतून संबंधित रक्कम संकलित करून तुमच्या अकाऊंटला क्रेडिट (जमा) करू. एनआरआय सर्व्हिस सेंटर, कोटक महिंद्रा बँक लि., पाचवा मजला, विनय भव्य कॉम्प्लेक्स, सीएसटी रोड, सांताक्रूझ पूर्व, मुंबई-४०० ०९८, भारत. तुमचे आमच्या बँकेकडील शाखेत असलेल्या खात्यात संबंधित प्रोसीड केलेले धनादेश जमा होण्याचा कालावधी चलनप्रकार व देश/किंवा त्याचे ठिकाण यावर अवलंबून राहील, आणि हा कालावधी आमच्या नोस्ट्रो अकाऊंटच्या निदर्शनास आल्यापासूनच्या तारखेपासून ६ ते २१ कार्यालयीन कामकाजाचे दिवस एवढा असेल.

**रोख परकीय चलन**

ग्राहकांसाठी रोख परकीय चलन यूएस डॉलर, युरो, ग्रेट ब्रिटन पाऊंड, जपानी येन, कॅनेडियन डॉलर आणि ऑस्ट्रेलियन डॉलर आदी चलनांत उपलब्ध करून देण्यात आली आहे. परकीय चलनाची विक्री रक्कम आरबीआयने वेळोवेळी आखून दिलेल्या नियमांच्या आधारेच करण्यात येईल.

**परकीय चलनातील डिमांड ड्राफ्ट**

एफसीवाय डीडी सुविधा परकीय चलनातील व्यवहार रेमिट करण्यासाठी फेमानुसार पुढील कारणांसाठी वापरली जाईल

- मित्र किंवा नातेवाईक यांना भेटवस्तू देण्यासाठी रेमिटन्स
- टोफेल, जीमॅट इत्यादींसारख्या विविध प्रवेश परीक्षांसाठी असलेले आवेदन शुल्क भरण्यासाठी
- परदेशातील विद्यापीठाचे शुल्क भरण्यासाठी
- परदेशातील वैद्यकीय उपचारासाठी आलेला खर्च भरण्यासाठी
- आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार मंजुरी असलेल्या इतर कोणत्याही व्यवहारासाठी

आमच्या शाखांतून वितरित होणारे एफसीवाय डिमांड ड्राफ्ट्स चार चलनांत उपलब्ध आहेत - यूएस डॉलर (यूएसडी), ग्रेट ब्रिटन पाऊंड्स (जीबीपी), युरो आणि जपानी येन (जेपीवाय)

**फिशिंग**

संकेतस्थळावरील संवेदनशील आणि गोपनीय माहिती मिळवण्याच्या गुन्हेगारी कृत्याला फिशिंग असे म्हटले जाते. एक विश्वासू संस्था असल्याचे भासवत एखाद्या संकेतस्थळावर यूजर्सना त्यांची गोपनीय माहिती जसे की, यूजर नेम, पासवर्डस, अकाऊंट तपशील, क्रेडिट कार्ड नंबर्स इत्यादी उघड करण्यास सांगितले जाते.

फिशिंगपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी काही सूचना

- बँकेच्या संकेतस्थळाला भेट देताना तुमच्या ब्राऊजर ॲड्रेस बारवर नेहमी आमचे यूआरएल, www.kotak.com, टाका.
- ई-मेलद्वारा वैयक्तिक माहिती कळवण्याच्या कोणत्याही विनंतीला प्रतिसाद देऊ नका.
- आमच्या संकेतस्थळाला भेट देताना तुमच्या ब्राऊजरखाली पॅडलॉक सिम्बॉल आहे ना याची नेहमी खात्री करून घ्या.
- कोणत्याही गैरप्रकाराबाबत आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा किंवा २४ तास सुरू असलेल्या कस्टमर केअर काँटॅक्ट सेंटरशी संपर्क साधा. तुम्ही आम्हाला त्याबाबत bank@kotak.com या ई-मेल पत्त्यावर मेल लिहूनही कळवू शकता.

**स्पूफिंग**

बेकायदेशीर पद्धतीने संवेदनशील माहिती प्राप्त करण्याच्या गैरप्रकाराला स्पूफिंग असे संबोधले जाते. ई-मेल स्पूफ हे मूळ पाठवणाऱ्याची (ओरिजिनल सेंडर) ओळख लपवून ठेवण्यासाठी तयार केलेले तंत्र आहे आणि ते तुम्हाला सत्य असल्याचे भासवते तसेच विश्वासू संस्थेकडून हा ई-मेल आला असल्याचेही भासवले जाते जेणेकरून यूजर त्याची खरी व गोपनीय माहिती ई-मेलद्वारे कळवेल. साधारणतः हा ई-मेल वैध पत्त्यावरून आल्याचे भासवले जाते मात्र त्याला उत्तर देण्यासाठी जो पत्ता दिला असतो तो खोटा किंवा धोकादायक असतो. मूळ संकेतस्थळासारखेच असल्याचे भासवून स्पूफ संकेतस्थळही तयार करता येते व त्यावर यूजर्सना त्यांची वैयक्तिक, गोपनीय माहिती शेअर करण्यास सांगितले जाते.

स्पूफिंगपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी काही सूचना

- कोटक महिंद्रा तुम्हाला ई-मेलद्वारे तुमची कोणतीही वैयक्तिक माहिती उघड करण्याची विनंती करत नाही.
- वैयक्तिक, आर्थिक किंवा सुरक्षात्मक माहितीची मागणी करणाऱ्या कोणत्याही ई-मेलला प्रतिसाद देऊ नका.
- अशा प्रकारच्या ई-मेलमधील कोणत्याही लिंकला क्लिकही करू नका.
- तुम्हाला एखादा संशयास्पद ई-मेल आला असल्याचे तुम्हाला वाटल्यास तुम्ही आमच्या नजीकच्या शाखेत त्याची माहिती द्या किंवा मग २४ तास सुरू असलेल्या कस्टमर केअर काँटॅक्ट सेंटरशी संपर्क साधा. तुम्ही आम्हाला त्याबाबत bank@kotak.com या ई-मेल पत्त्यावर मेल लिहूनही कळवू शकता.

**व्हिशिंग**

व्हिशिंग हे फिशिंगसारखेच असते मात्र यात बेकायदेशीररित्या गोपनीय माहिती प्राप्त करून घेण्यासाठी व्हीओआयपी (व्हॉइस ओव्हर इंटरनेट प्रोटोकॉल) तंत्राचा वापर करण्यात येतो. साधारणपणे ग्राहकाला एखाद्या खोट्या संस्थेकडून एक व्हॉइस कॉल करण्यात येतो व त्याला त्याची संवेदनशील माहिती आयव्हीआरसारख्या (इंटरॲक्टिव्ह व्हॉइस रिस्पॉन्स) टेलिफोन सिस्टीमवर उघड करण्यासाठी आग्रह केला जातो जसे की वैयक्तिक, आर्थिक किंवा सुरक्षात्मक माहिती.

व्हिशिंगपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी काही सूचना

- कोटक महिंद्रा बँकेकडून आलो आहोत असे भासवणाऱ्या कोणाकडेही तुमचा पासवर्ड किंवा पिन तुम्ही उघड करू नका. कृपया हे लक्षात ठेवा की, कोटक बँकेचा कोणताही कर्मचारी तुमच्याकडे पासवर्ड किंवा पिनची विचारणा करत नाही.
- कोणत्याही टेलिफोन सिस्टीमवर तुमची वैयक्तिक माहिती किंवा अकाऊंटशी संबंधित माहिती देण्यास सांगितले तर त्याला प्रतिसाद देऊ नका.
- कृपया खोट्या मेलमधील दूरध्वनी क्रमांकावर दूरध्वनी करण्यापूर्वी कोटक बँकेच्या २४ तास चालणाऱ्या कस्टमर केअर नंबरकडे दूरध्वनी करून संबंधित दूरध्वनी क्रमांकाची पडताळणी करून पाहा.
- तुम्हाला कोटक बँकेचा क्रमांक असल्यासारखे भासवून संबंधित दूरध्वनी क्रमांकावर दूरध्वनी करण्याचे सांगणारा कोणताही संशयास्पद मेल तुम्हाला आल्यास कृपया आमच्या नजीकच्या शाखेत त्याची माहिती द्या किंवा मग २४ तास सुरू असलेल्या कस्टमर केअर काँटॅक्ट सेंटरशी संपर्क साधा. तुम्ही आम्हाला त्याबाबत bank@kotak.com या ई-मेल पत्त्यावर मेल लिहूनही कळवू शकता.

**नेटबँकिंग सुरक्षेबाबतच्या सूचना**

- तुमचा पर्सनल आयडेंटिफिकेशन नंबर (पिन) कधीही लिहून ठेवू नका - तो स्मरणात ठेवा! पिन क्रमांक कोणालाही सांगू नका. तुमचा पिन किंवा यूजर आयडी किंवा पासवर्ड तुम्ही कोणाशी शेअर केला असेल आणि त्यातून तुम्हाला कोणतेही नुकसान झाले असेल तर त्याला कोटक महिंद्र बँक जबाबदार राहणार नाही.
- पिनची निवड करताना सहजपणे ओळखता येतील असे क्रमांक किंवा शब्द निवडू नका. आद्याक्षरे, फोन नंबर्स आणि जन्मतारीख यांचा वापर करणे टाळा.
- कोटक महिंद्रा बँक ई-मेल आणि एसएमएस अलर्ट सुविधा उपलब्ध करते ज्याद्वारे तुम्हाला तुमच्या खात्यात झालेल्या व्यवहाराचे अलर्टस मिळतात. बँकेकडून तुम्हाला पाठवण्यात आलेल्या ई-मेल/एसएमएस अलर्टसचा कायम माग ठेवा म्हणजे तुमच्या खात्यातील निधीबाबत तुम्हाला कायम माहिती असेल आणि त्याच्या गैरवापर होणे टळेल.
- तुमच्या नेटबँकिंग पासवर्डची सुरक्षा धोक्यात आल्याचा संशय तुम्हाला वाटला किंवा तुमचे डेबिट कार्ड हरवले तर कृपया आमच्या २४ तास सुरू असलेल्या कस्टमर केअर कॉंटॅक्ट सेंटरशी तातडीने संपर्क साधा.

कोणत्याही चौकशीसाठी कृपया आमच्या २४ तास सुरू असलेल्या कस्टमर कॉंटॅक्ट सेंटरशी संपर्क साधा किंवा मग bank@kotak.com या ठिकाणी मेल पाठवा. तुम्हाला मदत करण्यात आम्हाला आनंदच आहे.

**देशांतर्गत रेमिटन्स**

**डिमांड ड्राफ्ट्स (डीडी)/बँकर्स चेक (बीसी)**

**डिमांड ड्राफ्ट्स** : पैसे देण्याच्या प्रक्रियेला मूर्त रुप देण्यासाठी डिमांड ड्राफ्ट हे चांगले साधन आहे. पैसे देण्यासाठीचे ते निगोशिएबल साधन असून लेखी आदेशाद्वार ते तयार करता येते. बँक डीडी त्यांच्या स्वतःच्या शाखांमध्ये किंवा संबंधित शाखांमध्ये इश्यू करते तसेच ड्राफ्ट ड्रॉइंग व्यवस्थेनुसार संबंधित बँक स्थळ विभिन्न असेल तर बँक स्थानिक बँक शाखेसाठीही डीडी काढू शकते.

**बँकर्सचे धनादेश**

ग्राहकांना ही सुविधा निधीचे स्थानिक रेमिटन्स करण्यासाठी देण्यात आली आहे. बँकर्सचे धनादेश इश्युइंग शाखेकडेच काढले जातात आणि तेथेच ते देय असतात.

डीडी/बीसी यांच्या इश्युअन्ससाठी जनरल शेड्यूल ऑफ चार्जेसमध्ये उल्लेखित करण्यात आल्याप्रमाणे शुल्क आकारले जाते.

**नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर (एनईएफटी)**

भारतभरातील बँकिंग क्षेत्रात परिणामकारक, सुरक्षित, किफायतशीर, विश्वासार्ह आणि जलद फंड्स ट्रान्सफर आणि क्लिअरिंगसाठी आणि फंड्स ट्रान्सफर व क्लिअरिंग यांच्यासाठी विद्यमान अवस्थेत उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची पूर्तता करण्याच्या त्रासातून मुक्तीसाठी एनईएफटीचा वापर केला जातो.

**इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सिस्टीम (ईसीएस)**

लाभांश, कमिशन, व्याज इत्यादींसारख्या वारंवार होणाऱ्या व्यवहारांसाठी सतत द्याव्या लागणारी रक्कम आणि त्यासाठी आवश्यक कागदपत्रांची एकगठ्ठा पूर्तता या त्रासातून मुक्त होण्यासाठी त्याला पर्याय म्हणून पाहणाऱ्या ग्राहकांसाठी ही सुविधा उत्तम आहे आणि आरबीआयने आखून दिलेल्या नियमानुसारच त्याची अमलबजावणी केली जाते.

**रिअल टाइम ग्रॉस सेटलमेंट (आरटीजीएस)**

आरटीजीएस ही एका बँकेतून दुसऱ्या बँकेत पैसे हस्तांतरित करण्यासाठीची यंत्रणा आहे. पैशांचे हे हस्तांतरण ''रिअल टाइम'' आणि 'ग्रॉस'' यांच्यावर आधारलेले असते. बँकिंग चॅनेलच्या माध्यमातून पैसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणावर हस्तांतरित करण्याचे हे सर्वाधिक वेगवान आणि विश्वासार्ह साधन आहे. 'रिअल टाइम'' सेटलमेंट म्हणजे पेमेंट ट्रॅंझॅक्शनला कोणताही प्रतीक्षित कालावधी नाही. ट्रॅंझॅक्शनची प्रक्रिया झाली की तातडीने त्याची सेटलमेंट होते. 'ग्रॉस सेटलमेंट'' म्हणजे एकास एक या आधारावर करण्यात आलेला व्यवहार जो इतर कोणत्याही व्यवहाराशी धडकणार नाही. पैसे हस्तांतरण प्रक्रिया भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कीर्द खतावणीत नोंदवले जात असल्याचे गृहीत धरल्यास या पद्धतीत झालेले पेमेंट अंतिम आणि अटळ समजले जाते. आरटीजीएस सुविधेचा वापर करून ग्राहक २ लाख रुपये व त्यावरील कितीही रकमेचा व्यवहार करू शकतात.

**ग्राहकाच्या खात्याची गोपनीयता**

ग्राहकाच्या वैयक्तिक संमतीशिवाय बँक त्याच्या खात्याचा तपशील किंवा त्यातील व्यवहाराचे विवरण तिसऱ्या व्यक्तीला किंवा पक्षाला देऊ शकत नाही. तथापि, यालाही काही अपवाद आहेत. उदा. कायद्याद्वारे सक्ती करण्यात आली असल्यास माहिती उघड करावी लागते, असे करणे सार्वजनिक हिताचे असल्यास आणि बँकेलाच तशी माहिती हवी असल्यास.

**मृत डिपॉझिट अकाऊंटमधील देय रकमेची सेटलमेंट**

- ठेवीदाराने बँकेकडे वारसदाराची नोंदणी केली असेल तर मृत ठेवीदाराच्या खात्यात जमा असलेली शिल्लक रक्कम ठेवीदाराच्या वारसदाराच्या अकाऊंटमध्ये हस्तांतरित केली जाते. मात्र, त्यापूर्वी बँक संबंधित ठेवीदाराच्या ओळख इत्यादींबाबतची खातरजमा करून घेते.
- वरील प्रक्रिया जॉइंट अकाऊंटबाबतही केली जाईल, ज्यात वारसदाराचे नाव निर्देशित केले असेल.
- जॉइन्ट डिपॉझिट अकाऊंटमध्ये, जॉइंट अकाऊंटधारकांपैकी एकाचा मृत्यू होतो त्यावेळी बँकेला मृत व्यक्तीचे कायदेशीर वारसदार आणि जिवंत असलेला ठेवीदार या दोघांनाही एकत्रितरित्या पैसे द्यावे लागतात. तथापि, जॉइंट अकाऊंटधारकांनी असे जाहीर केले असेल की, खात्यातील शिल्लक रक्कम स्वतः किंवा वारसदार, फॉर्मर, उत्तराधिकारी किंवा वारसदार, वारसदारांपैकी किंवा वारसदारापैकी कोणीही इत्यादी असा उल्लेख केला असल्यास मृत अकाऊंटधारकाच्या कायदेशीर उत्तराधिकाऱ्याला त्यातील पैसे कोणत्याही प्रकारच्या दस्तऐवजाची पूर्तता करण्यात होणारा कालापव्यय टाळण्यासाठी तातडीने दिले जातील.
- वारसदाराचे नावच नसेल आणि बँकेला संशयालाही जागा नसेल त्यावेळी किंवा दावेदारांमध्ये कोणताही वाद नसेल तर बँक तुलनेत मृत ठेवीदाराच्या खात्यावर शिल्लक असलेली रक्कम अदा करेल आणि सर्व वैध वारसदारांची ओळख किंवा कायदेशीर वारसदारांनी पैसे घेण्याचे अधिकार दिलेली व्यक्ती यांची ओळख पटवल्यानंतर बँकेने वेळोवेळी केलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार पैसे दिले जातील. कायदेशीर बाबी पूर्ण करण्यात होणाऱ्या कालापव्यामुळे ठेवीदारांना त्यांचे हक्काचे पैसे मिळवण्यात मनःस्ताप होऊ नये यासाठी असे करण्यात येईल.

**मृत ठेवीदाराच्या खात्यातील टर्म डिपॉझिटवरील देय असलेले व्याज**

ठेवीच्या रकमेच्या मॅच्युरिटीआधीच ठेवीदाराचा मृत्यू झाला आणि ठेवीच्या रकमेचा दावा मॅच्युरिटीनंतर करण्यात आला तर बँक मॅच्युरिटीच्या तारखेपर्यंत ठरल्याप्रमाणे व्याज देईल. मॅच्युरिटीच्या तारखेपासून ते पेमेंटच्या तारखेपर्यंत बँक मॅच्युरिटीच्या तारखेला लागू असलेले व्याजच देईल, म्हणजे मॅच्युरिटीनंतरही रक्कम बँकेकडे जितके दिवस राहिली तितक्या दिवसांसाठी, कारण यासंदर्भात बँकेची काही धोरणे असतात.

तथापि, डिपॉझिटच्या मॅच्युरिटीनंतर ठेवीदाराचा मृत्यू झाल्यास बँक मॅच्युरिटीच्या तारखेपासून ते पेमेंट होण्याच्या तारखेपर्यं सेव्हिंग्ज डिपॉझिटवरील व्याजदराप्रमाणे व्याज देईल.

**डिपॉझिट्ससाठी विम्याचे कवच**

एका विशिष्ट मर्यादेपर्यंत आणि डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरेंटी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (डीआयसीजीसी) यांच्या अटीनियमांनुसार व प्रस्तावांनुसार बँकेतील डिपॉझिट्सना विमा योजना लागू होतात.

- परकीय बँकांच्या शाखा ज्या भारतात काम करत आहेत त्यांच्यासह सर्व व्यापारी बँका, स्थानिक बँका आणि विभागीय ग्रामीण बँका डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरेंटी कॉर्पोरेशन ऑफ इंडियाद्वारा (डीआयसीजीसी) इन्शुअर्ड आहेत.
- डीआयसीजीसी सेव्हिंग्ज, फिक्स्ड आणि करंट इत्यादींतील सर्व डिपॉझिट्सना विम्याचे कवच देते
- विविध शाखांमध्ये ठेवण्यात आलेले डिपॉझिट्स यांची सरासरी किमान ५,००,००० रुपयांपर्यंत (अक्षरी रुपये पाच लाख) असल्यास मुद्दल आणि व्याज रक्कम दोन्ही त्याच्या/तिच्याकडे समान हक्क आणि समान क्षमतेनुसार बँकेच्या परवान्याच्या लिक्विडेशन/रद्दीकरणाच्या तारखेपर्यंत सारखेच राहील किंवा विलिनीकरण/समामेलन/मर्जर यांपैकी काहीही अंमलात येईपर्यंत चालू राहील.

- कमाल ५ लाख रुपयांपर्यंत डीआयसीजीसी मुद्दल आणि व्याज यांवर विमाकवच देते. उदा. - एखाद्या व्यक्तीच्या खात्यात ४,९५,००० रुपये मुद्दल असेल आणि त्यावरील व्याज ४,००० रुपये असेल तर डीआयसीजीसीकडून विमाकवच मिळालेली रक्कम असेल ४,९९,००० रुपये. तथापि, त्याच खात्यात ५ लाख रुपये असतील तर त्यावरील व्याजाला विमाकवच मिळणार नाही, ते व्याज आहे म्हणून नव्हे तर ५ लाख रुपये विमा रक्कम मर्यादेहून अधिक ती रक्कम असल्यामुळे असे होईल.

- एकाच बँकेत एकाच मालकी पद्धतीच्या खात्यात निधी असेल तर डिपॉझिट विमा निश्चित करण्यापूर्वी तो सर्व निधी एकत्रित केला जाईल. मात्र निधी वेगवेगळ्या बँकांत वेगवेगळ्या मालकी पद्धतीने ठेवला गेला असेल तर त्याला विभिन्न पद्धतीने विमाकवच दिले जाईल. तुम्ही एकापेक्षा अधिक बँकेत रक्कम जमा केली असेल तर प्रत्येक बँकेतील तुमच्या रकमेला विभिन्न डिपॉझिट विमाकवच मर्यादा लागू असेल.

- एखादी व्यक्ती बँकेच्या एकाच किंवा अधिक शाखेत एकापेक्षा अधिक डिपॉझिट ठेवत असेल तर, उदाहरणार्थ - श्री. क्ष यांनी एक किंवा अधिक करंट/सेव्हिंग्ज अकाऊंट सुरू केली आणि एक किंवा अधिक फिक्स्ड/रिकरिंग डिपॉझिट अकाऊंट्स इत्यादी सुरू केले तर हे सर्व अकाऊंट्स एकाच्या मालकीचे आणि एकाच्याच हक्काचे समजले जातील. त्यामुळे या सर्व खात्यांतील शिलकींची सरासरी काढली जाईल आणि कमाल ५ लाख रुपये रकमेपर्यंत विमाकवच बहाल केले जाईल. श्री. क्ष यांनी त्यांच्या क्षमतेनुसार बँकेच्या एका किंवा अनेक शाखांमध्ये इतर अकाऊंट सुरू केले जसे की, एखाद्या संस्थेचा भागीदार म्हणून किंवा अल्पवयीनाचा पालक म्हणून किंवा कंपनीचा संचालक म्हणून किंवा विश्वस्त संस्थेचा विश्वस्त म्हणून किंवा त्यांची पत्नी सौ. य यांच्या जॉइंट अकाऊंटमध्ये, तर हे सर्व अकाऊंट्स विभिन्न क्षमता आणि विभिन्न हक्कानुसार सुरू करण्यात आले आहेत असे समजण्यात येईल. तसेच ही सर्व डिपॉझिट अकाऊंट्स विभिन्नरित्या ५ लाख रुपयांपर्यंतच्या विमाकवचालाही पात्र असतील.

- प्रोप्रायटरीच्या माध्यमातून, ज्यात ठेवीदार हाच एकल प्रोप्रायटर असतो, डिपॉझिट ठेवले असेल आणि डिपॉझिटची रक्कम एखाद्या व्यक्तीच्या क्षमतेनुसार असेल तर त्यांची सरासरी काढली जाऊन कमाल ५ लाख रुपयांपर्यंत विमाकवच बहाल केले जाईल.

अधिक माहितीसाठी कृपया www.dicgc.org.in हे संकेतस्थळ पाहा.

**निष्क्रिय खाते**

ज्या खात्यांत सलग २४ महिने ग्राहकाकडून कोणताही व्यवहार होत नसेल (यात सिस्टीमद्वारे झालेल्या व्यवहारांचा जसे की, क्रेडिट व्याज, डेबिट व्याज यांचा समावेश नसेल) असे खाते निष्क्रिय खाते म्हणून गृहीत धरले जाईल, हे ग्राहकाच्या हिताचेच असेल. अशा प्रकारचे निष्क्रिय खाते तेव्हाच सक्रिय केले जाईल जेव्हा ग्राहक तशी लेखी विनंती करेल व त्याची ओळख दर्शवणारे पुरावे बँकेकडे सादर करेल तसेच खाते पुन्हा सक्रिय करण्यासाठी त्यात आर्थिक व्यवहाराची हमी देईल. खाते निष्क्रिय असेपर्यंत एटीएम, नेटबँकिंग, मोबाइल बँकिंग, फोन बँकिंग इत्यादी प्रकारचे सोयिस्कर बँकिंग चॅनेल्सद्वारा होणाऱ्या व्यवहारांना बँकेची परवानगी नसेल.

**सेफ डिपॉझिट लॉकर्स**

ही सुविधा बँकेच्या निवडक शाखांवरच उपलब्ध आहे आणि जेथे ही सुविधा उपलब्ध आहे त्या ठिकाणी सेवेशी संबंधित सर्व अटी-नियमांचे पालन काटेकोरपणे होत आहे ना याची खात्री करून व त्यांच्या उपलब्धतेनुसारच सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ऍलॉट केले जातील. सेफ डिपॉझिट लॉकर्स एका व्यक्तीकडून (अल्पवयीन नसणे) किंवा इतर व्यक्तीबरोबर जॉइंटली, एचयूएफ, संस्था, लिमिटेड कंपन्या, संघटना, सोसायट्या, ट्रस्ट्स इत्यादींकडून घेतले जाऊ शकतात. एकाच व्यक्तीकडून किंवा जॉइंट असेल सेफ डिपॉझिट लॉकर असेल तर नामनिर्देशन (वारसदार नेमणे) सुविधा उपलब्ध आहे. वारसदार नसलेल्या व सेफ डिपॉझिट लॉकर असलेल्या एकाच व्यक्तीचा मृत्यू झाला, परंतु त्याचे शहानिशा झालेले मृत्यूपत्र तयार असल्यास, एक्झिक्युटर/प्रशासकाला त्या व्यक्तीच्या खात्याचा ऍक्सेस मिळू शकेल.

**तक्रारी / गाऱ्हाणे**

बँकेतर्फे पुरवल्या जाणाऱ्या सेवांविषयी ग्राहकाला कोणतीही तक्रार असेल तर ग्राहकांच्या तक्रारींच्या निवारणासाठी बँकेने स्थापन केलेल्या अधिकाऱ्याकडे दाद मागण्याचा अधिकार ग्राहकाला आहे. ग्राहक तक्रार निवारण मंचाची तपशीलवार माहिती बँकेच्या संकेतस्थळावर आणि बँकेच्या कोणत्याही शाखेच्या आवारात उपलब्ध आहे. तक्रार दाखल करण्यासंदर्भातील सर्व प्रक्रियेची माहिती संबंधित शाखेतील कर्मचाऱ्यांनी ग्राहकाला द्यावी. तक्रार दाखल केल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत ग्राहकाला त्याच्या/तिच्या तक्रारीविषयी समाधानकारक प्रतिसाद मिळाला नाही तर भारतीय रिझर्व्ह बँकेकडून नियुक्त करण्यात आलेल्या बँकिंग ओम्बड्समैनकडे दाद मागण्याचा त्याला/तिला अधिकार आहे.

**चेक ड्रॉप बॉक्स आणि चेकची पोचपावती**

चेक ड्रॉप बॉक्स सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच बँकेच्या सर्व शाखांमध्ये ग्राहकाने मागितल्यास त्याने डिपॉझिट केलेल्या कोणत्याही चेकची पोचपावती देण्याची सुविधा उपलब्ध आहे. तसेच शाखेच्या एटीएम ड्रॉप बॉक्सेसवर असेही सूचित करण्यात आले आहे की, 'ग्राहक त्यांचे चेक्स काऊंटरवरही देऊ शकतात व पे-इन-स्लिपच्या माध्यमातून त्यांची पोचपावती प्राप्त करू शकतात.''

**डू नॉट कॉल रजिस्ट्री**

बँक त्यांच्या नवनवीन सेवासुविधा, उत्पादनांविषयी सातत्याने ग्राहकांना माहिती पुरवत असते. आम्ही याची माहिती आमच्या ग्राहकांना पत्र, ई-मेल किंवा फोनद्वारे देतो आणि केवळ अशा ग्राहकांनाच देतो की ज्यांना या सोयीसुविधा व उत्पादने त्यांच्या फायद्यासाठी आहेत असे वाटते.

आम्ही तुमच्या खासगीपणाचा आदर करतो, आणि हेही मान्य करतो की, तुमच्यापैकी काहींना आमच्या टेलिमार्केटिंग प्रक्रियेद्वारे फोन/ई-मेल/एसएमएसने संपर्क साधणे फारसे आवडणार नाही. तुमच्याबाबतीत असे झाल्यास तुम्ही आमच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली डू नॉट कॉल नोंदणी सुविधेचा लाभ घेऊ शकता किंवा आम्हाला पत्राद्वारे कळवू शकता किंवा मग दूरध्वनी करून तुमचा आमच्या टेलिमार्केटिंगच्या यादीत असलेला दूरध्वनी क्रमांक काढून टाकण्याची सूचनाही करू शकता. तुमची नोंदणी करण्यासाठी तुम्ही दिलेला तपशील गोपनीय ठेवला जाईल.

एकदा तुम्ही नोंदणी केलीत की...

- तुम्हाला तुमच्या नोंदणीकृत क्रमांकावर कोणताही त्रासदायक दूरध्वनी येणार नाही, याची आम्ही हरतऱ्हेने काळजी घेऊ.
- आमच्या टेलिमार्केटिंग यादीतून तुमचा विशिष्ट क्रमांक काढून टाकण्यासाठी कृपया आम्हाला १५ कार्यालयीन दिवसांची मुदत द्या.

**डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट सेवा**

बॅक आपल्या ग्राहकांना वित्तीय उत्पादनांची आणि सेवांची विस्तृत श्रेणी प्रदान करते, ज्यामध्ये डिपॉझिटरी सेवांचाही समावेश होतो. बँक संपूर्ण भारतातील आपल्या शाखांच्या जाळ्याच्या माध्यमातून डिपॉझिटरी सेवा प्रदान करण्यासाठी दोन्ही डिपॉझिटरीजकडे (म्हणजेच एनएसडीएल आणि सीडीएसएल) डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट (डीपी) म्हणून नोंदणीकृत आहे. ह्या सेवांमध्ये खाते उघडणे आणि त्याची देखभाल करणे, डिमटेरियलाझेशन, रिमटेरियलायझेशन, मार्केट हस्तांतरणाद्वारे ट्रेड्सची हिशेबपूर्ती करणे, ऑफ मार्केट हस्तांतरण, इंटर-डिपॉझिटरी हस्तांतरण, नामनिर्देशन, ट्रान्समिशन (प्रेषण), जनसांख्यिकीय तपशीलामधील बदल इत्यादी सेवांचा समावेश आहे.

**खाते उघडणे**: ग्राहकाने त्याच्या/तिच्या शेअर सर्टिफिकेट्सच्या स्वरूपातील वास्तविक होल्डिंग्सचे (धारणा) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात रुपांतरण करण्याच्या हेतूसाठी डिमॅट खाते उघडणे गरजेचे आहे. वास्तविक (फिजिकल) शेअर्सचे इलेक्ट्रॉनिक स्वरूपात रुपांतरण करून घेण्यासाठी शेअर सर्टिफिकेट्सच्या होल्डिंग पॅटर्नप्रमाणे खाते उघडावे लागते. दुय्यम (सेकंडरी) मार्केटमधील व्यवहारांच्या बाबतीत, म्हणजेच नोंदणीकृत स्टॉक ब्रोकरद्वारे शेअर्सच्या खरेदीच्या/विक्रीच्या बाबतीत, ग्राहकाने त्याच्या खात्यामध्ये शेअर्स क्रेडिट/डेबिट होण्यासाठी ब्रोकरला त्याच्या डिमॅट खात्याचा तपशील प्रदान करणे गरजेचे आहे. डिमॅट खाते उघडण्यासाठी ग्राहकाने डिपॉझिटरी पार्टिसिपन्टकडे (डीपीकडे) संबंधित केवायसी दस्तऐवजांसह खाते उघडण्याचे यथोचितरीत्या भरलेले आवेदन प्रपत्र सादर करणे गरजचे आहे. सर्व दस्तऐवज स्वयं-साक्षांकीत असायला हवेत. क्लायंटकडून दस्तऐवज/तपशील सादर करण्यासह आवेदनावर यशस्वीपणे प्रक्रिया करण्यात येण्यापश्चात, डिमॅट खाते उघडले जाते आणि बँकेकडून ग्राहकाला सदरची देवाणघेवाण करण्यात येते. ग्राहकाने भविष्यामध्ये बँकेसोबतच्या सर्व संपर्कव्यवहारांमध्ये डिमॅट खात्याचा उल्लेख करणे गरजेचे आहे.

**शेअर्सचे डिमटेरियलायझेशन**: डिमटेरियलायझेशनसाठी संबंधित डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत करण्यात आलेल्या सिक्युरिटीजचं डिमटेरियलाइज्ड करता येऊ शकतील. खातेधारकाच्या नावे नोंदणीकृत असलेल्या होल्डिंग्सच डिमटेरियलाइज्ड करता येऊ शकतील. ट्रान्सपोझिशन सह डिमॅट सुविधा उपलब्ध आहे ज्यामध्ये शेअर्स सर्टिफिकेट्स हे नावांच्या वेगवेगळ्या क्रमामध्ये असले, तरीही एकाच खात्यामध्ये सिक्युरिटीज डिमटेरियलाइज्ड करता येऊ शकतील. क्लायंट (नोंदणीकृत मालक) हा डिमटेरियलाइज्ड करावयाच्या सिक्युरिटीजसह डिमटेरियलायझेशनसाठी विहित डिमॅट विनंती प्रपत्रामध्ये शाखेला विनंती सादर करेल.

विनंती सादर करण्यापूर्वी, क्लायंटने 'डिमेरियलाझेशनसाठी स्वाधीन' असे लिहून सर्टिफिकेट्स विरूपित करायचे आहेत. सामान्य स्थितीमध्ये, डीपीकडे डिमॅट विनंती सादर केल्याच्या तारखेपासून जवळपास ३० दिवसांमध्ये क्लायंटला डिमॅटविषयक पुष्टी प्राप्त होईल. प्रत्येक कंपनीचे शेअर्स डिमटेरियलाइज्ड करण्यासाठी स्वतंत्रपणे विनंती करणे आवश्यक आहे. अनेक कंपन्या असण्याच्या बाबतीत, डिमटेरियलाझेशनसाठी स्वतंत्र विनंत्या करणे आवश्यक आहे. शाखा ही डिमटेरियलाझेशनसाठी कंपनीच्या उपलब्धतेकरिता विनंत्यांवर देण्यात आलेल्या तपशीलांची पडताळणी करते. डिमॅट खात्यामधील सर्व खातेधारकांनी विनंती प्रपत्रावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. डिमॅट खात्याप्रती विनंती प्रपत्रावर करण्यात आलेल्या स्वाक्षरीची शाखेकडून पडताळणी करण्यात येते. सर्व काही योग्य असल्याचे आढळल्यास, शाखा ही प्रणालीमधील विनंतीसंबंधित सर्व तपशील प्राप्त करते आणि पुढील प्रक्रियेसाठी तो तपशील सेंट्रलाइज्ड डिपॉझिटरी कामकाजांकरिता पुढे पाठविते. संबंधित आरटीएकडे/कंपनीकडे पाठविण्यात आलेल्या विनंतीवर एकतर प्रक्रिया केली जाते/ती नाकारली जाते. विनंती नाकारण्यात येण्याच्या बाबतीत, आवश्यक निवारणासाठी दस्तऐवज ग्राहकाकडे परत पाठविले जातात, त्यानंतर डिमटेरियलाझेशनच्या हेतूसाठी विनंती पुन्हा सादर करणे गरजेचे असते.

**शेअर्स रिमटेरियलाझेशन**ः इलेक्ट्रॉनिक स्वरूपात धारण करण्यात आलेल्या सिक्युरिटीज आणि ग्राहकाला पुन्हा एकदा त्या वास्तविक स्वरूपात धारण करायच्या असल्यास, ग्राहकाने शाखेमध्ये रिमटेरियलायझेशन विनंती सादर करणे गरजेचे आहे. ग्राहकाला डिमॅट खात्यामधील केवळ मुक्त शिल्लक होल्डिंग्सलाच वास्तविक स्वरूपात रुपांतरित करता येऊ शकते. शाखा डिमॅट खात्यामधील सर्व खातेधारकांच्या स्वाक्षऱ्या आणि डिमॅट खात्यामधील मुक्त होल्डिंग्स ह्यांसह आवेदन प्रपत्रामध्ये उल्लेख करण्यात आलेल्या तपशीलांची पडताळणी करते. सर्व काही योग्य असल्याचे आढळल्यास, शाखा ही प्रणालीमधील विनंतीसंबंधित सर्व तपशील प्राप्त करते आणि पुढील प्रक्रियेसाठी तो तपशील सेंट्रलाइज्ड डिपॉझिटरी कामकाजांकरिता पुढे पाठविते. संबंधित आरटीएकडे/कंपनीकडे पाठविण्यात आलेल्या विनंतीवर एकतर प्रक्रिया केली जाते/ती नाकारली जाते. विनंती नाकारण्यात येण्याच्या बाबतीत, आवश्यक निवारणासाठी दस्तऐवज ग्राहकाकडे परत पाठविले जातात.

**ट्रेड्सची हिशेबपूर्ती (सेटलमेन्ट)**ः स्टॉक इक्स्चेंजच्या मार्गाने शेअर्सची विक्री करण्यासाठी ग्राहकाने सेबी नोंदणीकृत ब्रोकरसोबत (समाशोधन सदस्यासोबत) ट्रेडिंग खाते उघडणे गरजेचे असते. ब्रोकरच्या माध्यमातून शेअरच्या विक्रीपश्चात ग्राहकाने टी+२ दिवसांच्या आत आपल्या डिमॅट खात्यामधून ब्रोकरच्या पूल खात्यामध्ये शेअर्सचे हस्तांतरण करणे आवश्यक असते. ग्राहकाने डिलिव्हरी इन्स्ट्रक्शन स्लिपवर सीएम-बीपी आयडी (समाशोधन सदस्य), सेटलमेन्ट विभाग, सेटलमेन्ट क्रमांक तपशील इत्यादींसह तसेच इन्स्ट्रक्शन स्लिपवर शेअर्स आणि त्यांची संख्या ह्या तपशीलाचा उल्लेख करून शाखेच्या ठिकाणी डिलिव्हरी इन्स्ट्रक्शन स्लिप सादर करणे गरजेचे असते. अशा ट्रेड्सना 'ऑन-मार्केट ट्रेड्स' असे म्हटले जाते ज्यामध्ये संबंधित स्टॉक इक्स्चेंजद्वारे ट्रेडची हिशेबपूर्ती (सेटलमेन्ट) केली जाते. त्याच प्रकारे ग्राहकाला एकाच डिपॉझिटरीसोबत एका डिमॅट खात्यामधून दुसऱ्या डिमॅट खात्यामध्ये हस्तांतरण करायचे आहे ज्यामध्ये कोणतेही हिशेबपूर्ती आबंधन नाही, त्यांना 'ऑफ-मार्केट ट्रेड्स' असे म्हटले जाते.

इंटर-डिपॉझिटरी इन्स्ट्रक्शन्सच्या बाबतीत ज्यामध्ये एका डिपॉझिटरीमध्ये धारण करण्यात आलेल्या एका डिमॅट खात्यामधून शेअर्स हे दुसऱ्या डिपॉझिटरीमध्ये धारण करण्यात आलेल्या दुसऱ्या डिमॅट खात्यामध्ये जातात, त्याला 'इंटर-डिपॉझिटरी ट्रेड्स' असे म्हणतात.

यथोचितरीत्या भरलेली इन्स्ट्रक्शन स्लिप प्राप्त झाल्यावर, इन्स्ट्रक्शन स्लिपवर भरण्यात आलेल्या सर्व संबंधित तपशीलांची शाखेकडून पडताळणी करण्यात येते आणि सर्व काही ठीक असल्यास आणि तपशील पूर्णपणे भरण्यात आलेला असल्यास प्रणालीमध्ये व्यवहाराची अंमलबजावणी होते. सदर नाकारण्यात येण्याच्या बाबतीत, आवश्यक दुरुस्तीसाठी त्वरित त्याबाबत कळविण्यात येते.

**नामनिर्देशन**

क्लायंट आपल्या डिमॅट खात्यामधील विहित नामनिर्देशन प्रपत्र भरून कोणत्याही व्यक्तीच्या नावे नामनिर्देशन करू शकतो. केवळ नामनिर्देशन प्रपत्र भरून आणि ते शाखेमध्ये सादर करून खातेधारक हा/हे कोणत्याही वेळी नामनिर्देशनामध्ये बदल करू शकतो/नामनिर्देशन काढून टाकू शकतो. खातेधारकाचा मृत्यू होण्याच्या बाबतीत डिमॅट खात्यामधील शेअर्स हे मृत्यूच्या वेळी नोंदणीकृत करण्यात आलेल्या नामनिर्देशित व्यक्तीच्या नावे हस्तांतरीत होतील. डिमॅट खात्यामध्ये नामनिर्देशन करण्याची नेहमीच शिफारस करण्यात येते.

**ट्रान्समिशन (प्रेषण)**

मयत व्यक्ती ही संयुक्त खातेधारकांपैकी एक असल्यास, मयत व्यक्तीच्या खात्यामध्ये असणाऱ्या सिक्युरिटीजचे उत्तरजीवी धारकांच्या खात्यामध्ये प्रेषण करण्यासाठी उत्तरजीवी धारकांनी नोटराइज्ड मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रतीसह विहित प्रेषण (ट्रान्समिशन) प्रपत्राद्वारे बँकेला त्याबाबत विनंती करायची आहे. ह्या हेतूसाठी, उत्तरजीवी धारकाचे (धारकांचे) डिपॉझिटरी खाते असणे आवश्यक आहे, जे समान डीपीसह किंवा वेगळ्या डीपीसह एका डिपॉझिटरीच्या किंवा दुसऱ्या डिपॉझिटरीच्या अंतर्गतही असू शकते.

एकमेव धारकाच्या मृत्यूच्या बाबतीत, मयत व्यक्तीच्या डिमॅट खात्यामध्ये असलेल्या शिलकीचे प्रेषण कायदेशीर वारसाच्या (वारसांच्या) किंवा कायदेशीर प्रतिनिधीच्या (प्रतिनिधींच्या) खात्यामध्ये करण्यासाठी मयत व्यक्तीच्या कायदेशीर वारसाने (वारसांनी) किंवा कायदेशीर प्रतिनिधीने (प्रतिनिधींनी) संबंधित दस्तऐवज सादर करून बँकेच्या शाखेशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

**इतर कार्ये**ः इतर कार्यांमध्ये डिमॅट खाते उघडल्यानंतर पत्ता, बँकेचा तपशील अद्ययावत करणे; स्वाक्षरी, नामनिर्देशन इत्यादींसारख्या कोणत्याही बदलांचा समावेश होतो. ग्राहकाने आवश्यक अद्ययावतीकरणासाठी विहित नमुन्यामध्ये बँकेच्या शाखेमध्ये संबंधित विनंती सादर करणे गरजेचे आहे. डिमॅट खात्यामधील तपशील यशस्वीपणे अद्ययावत करण्यात आल्यावर, बँक ग्राहकाला आवश्यक ती पुष्टी प्रदान करेल.

कोटक महिंद्रा समूहाकडे हक्क अबाधित. सर्व हक्क आरक्षित.